# प्रस्तावित :- मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना

**उदिष्ट :-** उमेदवारांना उदयोजकाकडे प्रत्यक्ष कार्य प्रशिक्षणाद्वारे रोजगारक्षम करणे.

**आर्थिक तरतुद :-**

- "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेकरीता रु.5,500 कोटी (पाच हजार पाचशे कोटी फक्त) निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचे स्वरूप:-**

- उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) द्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

**योजनेचे ठळक वैशिष्टे-:**

- या संकेतस्थळावर बारावी, आय.टी.आय., पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेले रोजगार इच्छुक उमेदवार ऑनलाईन नोंदणी करू शकतील.
- विविध क्षेत्रातील मोठे प्रकल्प,उद्योग/स्टार्टअप्स, विविध आस्थापना इ.यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी ऑनलाईन नोंदवतील.
- सुमारे १० लाख कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) च्या संधी प्रत्येक आर्थिक वर्षात या योजनेच्या माध्यमातून उपलब्ध होतील.
- सदर कार्य प्रशिक्षण (इंटर्नशिप) चा कालावधी ६ महिने असेल व या कालावधीसाठी उमेदवारांना या शासनामार्फत विद्यावेतन देण्यात येईल.
- सदर विद्यावेतन लाभार्थ्याच्या थेट बँक खात्यात (DBT) जमा करण्यात येईल.

**आस्थापना/उद्योजकासाठी पात्रता**

- आस्थापना / उद्योग महाराष्ट्र राज्यात कार्यरत असावा.
- आस्थापना / उद्योजकाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी.
- आस्थापना / उद्योगाची स्थापना किमान ३ वर्ष पूर्वीची असावी.
- आस्थापना / उद्योगांनी EPF, ESIC, GST, Certificate of incorporation, DPIT व उद्योग आधारची नोंदणी केलेली असावी.

**उमेदवारांची पात्रता:**

- उमेदवाराचे किमान वय १८ व कमाल ३५ वर्ष असावे.
- उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता १२ वी पास/ आयटीआय/पदविका/पदवीधर/ पदव्युत्तर असावी.
- उमेदवार हा महाराष्ट्राचा अधिवासी असावा.
- उमेदवाराचे आधार नोंदणी असावी.
- उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे
- उमेदवाराने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी.

**शैक्षणिक अर्हतेप्रमाणे विद्यावेतनाचे विवरण खालील प्रमाणे असेल.**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | प्रतिमाह विद्यावेतन रु. |
|---|---|---|
| १. | १२ वी पास | रु. 6,०००/- |
| २. | आय.टी.आय/ पदविका | रु. 8,०००/- |
| ३. | पदवीधर /पदव्युत्तर | रु. १०,०००/- |

संलग्नक: कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र शासनाद्वारे दिनांक ०९.०७.२०२४ रोजी जारी केलेला शासन निर्णय (संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९०/व्यशि-३).

# Brief note on Mukhyamantri Yuva Karya Prashikshan Yojana: Internship Scheme for Unemployed Youth

**Overview:** The Government of Maharashtra has introduced the **Mukhyamantri Yuva Karya Prashikshan Yojana**, an initiative designed to provide internship opportunities to the unemployed youth of the state. This scheme aims to enhance the employability and skill set of young individuals, preparing them for a competitive job market.

**Objectives:** To enhance candidates' employability through practical training with entrepreneurs.

**Implementing Agency:** Department of Skills, Employment, Entrepreneurship & Innovation along with Mukhyamantri Jan Kalyan Kaksh.

**Eligibility Criteria:**

**For Candidates:**

1. Should be in the age group of 18 to 35.
2. Minimum Education Criteria: 12th Pass/ITI/Diploma/Graduation / Post Graduation.
3. Should be the resident of Maharashtra.

**For Industries & Establishments:**

1. Should be working in Maharashtra.
2. Should registered with Skills, Employment, Entrepreneurship & Innovation web-portal as an employer.
3. Should have established for 3 years.
4. Should registered with EPF, ESIC, GST, DPIT & Udyog Aadhar & have certificate ofincorporation.

**Salient Features of the Scheme:**

- Duration: Internships will be for 6 months.
- Stipend: Interns will receive a monthly stipend as per their education qualificationin the form of Direct Benefit Transfer (DBT). Following table explains the stipend:

| Sr. No. | Education Qualification | Per Month Stipend in Rs. |
|---|---|---|
| 1 | 12th Pass | 6,000/- |
| 2 | ITI / Diploma | 8,000/- |
| 3 | Degree / Post Graduation | 10,000/- |

- **Participation:** Open to both government establishments and private sector industries.

**Contact Information:**

For further details and assistance, applicants and establishments can visit their respective District Skill Development, Employment & Entrepreneurship Guidance Centeror contact the helpline number provided on the portal.

**Enclosure:** Government Resolution issued by the Department of Skills, Employment, Entrepreneurship & Innovation, Government of Maharashtra on 09.07.2024 (संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९०/व्यशि-३).